RNI-MAHMAR/2016/66483

ISSN 2455-9970



शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राला वाहिलेले मासिक

# जीवन गौरव


वर्ष पहिले / अंक अकरावा / नोव्हेंबर २०१६



# अंतरंग


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय : बालदिनाच्या निमित्ताने... | रामदास वाघमारे | ३ |
| २. | हरवलेलं बालपण | प्रविण ढाकरे | ४ |
| ३. | पंडीतजींचे बालप्रेम | राजश्री पल्लेवाड | ५ |
| ४. | बालपणीचा काळ सुखाचा | संदीप ढाकणे | ६ |
| [illegible] | किशोरवयीन मुलांना समजून घेताना | अलका थाले | ८ |
| ६. | प्रा.डॉ. ऋषिकेश कांबळे यांची विशेष मुलाखत | रामदास वाघमारे | १० |
| ७. | निळ्या आभाळाचे गाणे | प्रा. डॉ. सतीश मस्के | १२ |
| ८. | साहित्यिक यशवंतराव चव्हाण | संतोष बोंगाळे | १५ |
| ९. | यशवंतराव चव्हाण : व्यक्तिमत्त्व ते कर्तृत्व | रवींद्र पाटील | १८ |
| १०. | तुम्ही ज्ञानसूर्य व्हा | दीपक सोनवणे | २१ |
| ११. | 'स्त्री' एक सोनेरी पर्व | कल्पना फुसे | २३ |
| १२. | समाजाला जगवण्यासाठी जागवले पाहिजे | दीपक सोनवणे | २५ |
| १३. | शालेय जगत : प्रा. डी. आर. चव्हाण यांची मुलाखत | डॉ. संदीप तुपे | २७ |
| १४. | माझी शाळा, माझे उपक्रम | मधुरा सोहनी | २९ |
| १५. | छंद वर्ग | मनिषा मुळूक | ३१ |
| १६. | वस्तीशाळेचा वटवृक्ष | नागनाथ घाटुळे | ३३ |
| १७. | शासन निर्णय:सेवापुस्तिकेची दुसरी प्रत कर्मचाऱ्याला... | | ३५ |
| १७. | कविता | लक्ष्मण सावंत, अशोक गायकवाड, विश्वनाथ ससे, भाग्यश्री फुलेलवाड | |
| १८. | संतवाणी | अर्चना खोब्रागडे | |





# साहित्यिक यशवंतराव चव्हाण

- श्री. संतोष बोंगाळे
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर. भ्रमणध्वनी-९९२३९००८४०

प्रत्येक महापुरुष हा त्या त्या काळाची निर्मिती असतो. तत्कालीन ज्वलंत प्रश्नांचा वेध घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी असे महापुरुष स्वतःचे जीवन समर्पित करीत असतात. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्रातील थोर महापुरुष होत. समतोल राजकारणी, कुशल मुत्सद्दी, समाजसुधारक, उत्तम वक्ता, उत्तम प्रशासक, साहित्यिक, तत्त्वचिंतक, सह्याद्रीचा मानबिंदू, माणसे जोडणारा सुसंस्कारित नेता म्हणून त्यांचे जीवन समृद्ध होते. महाराष्ट्राची आजची प्रगती ही त्यांच्याच विचाराने प्रगल्भ झालेली दिसते.



मध्यमवर्गीय कुटुंबात यशवंतरावांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी देवराष्ट्रे येथे झाला. आपल्या सद्गुणांच्या बळावर त्यांनी गरीब शेतकरी कुटुंबातील मुलगा ते राष्ट्रीय नेता अशी गरुडझेप घेतली. त्यांची आर्थिक परिस्थिती सर्वसामान्य होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागात झाले. नंतरच्या काळात कराड येथे शिक्षणानिमित्त आल्यावर त्यांना चौफेर वाचनाची नामी संधी मिळाली. वाचनामुळे व वास्तव हलाखीचे जीवन जगणे अत्यंत जवळून अनुभवले असल्याने त्यांच्यामध्ये सामाजिक दृष्टी निर्माण झाली. त्यांनी राजकारण सांभाळून कृष्णाकाठ, सह्याद्रीचे वारे, युगांतर, ऋणानुबंध यासारखे आत्मकथनपर त्याचबरोबर ललित लेखनसुध्दा केले आहे. त्यांच्या लेखनावरून त्याचे ललित लेखक होण्याचे स्वप्न दिसून येते; मात्र आपल्या राजकीय जीवनाच्या धावपळीत त्यांचे हे स्वप्न त्यांना बाजूला ठेवावे लागले असले, तरी मनात रुजलेला वाङ्मयीन संस्कार मात्र त्यांचा कधीच मिटला नाही. सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे येथे जन्मलेले व त्यांना आई विठाबाईने निग्रहाने सांभाळले, घडवले. स्वातंत्र्य पूर्व काळात कराड येथे शालेय शिक्षण घेत असताना त्यांनी तिरंगा फडकवल्याबद्दल ६ महिने तुरुंगवासही भोगला.

यशवंतराव यांचे व्यक्तिमत्त्व खूपच लोभस असल्याने त्यांच्यातले लालित्य त्यांच्या वाणीतून अखंड पाझरत होते. त्यांचे जे भाषण असायचे तेच वाङःमय असायचे. यशवंतराव चव्हाण हे राजकीय नेते असल्याने त्यांचे साहित्यविषयक ज्ञान व गुण अनेकांच्या अज्ञानातच राहिल्याचे दिसते. यशवंतराव आपल्या जन्मदात्री मातेचे, कर्मभूमी कराडचे व मातृभूमीचे ऋण कधीही विसरत नाहीत. कृष्णाकाठचा मृद्गंध त्यांच्या साहित्यातून आजही येतो. तेथे राहणारी साधीभोळी माणसे ही त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहेत.

साहित्याचे बाळकडू घेऊनच ते काव्यमय प्रदेशात वावरले. वाचनाची आवड त्यांना लहानपणापासूनच होती. त्यांना चांगल्या मराठी आणि इंग्रजी पुस्तकांची आवड होती. दिल्लीच्या दौऱ्यावर असो की विदेशाच्या, त्यांच्या नियोजित कार्यक्रमातून वेळ काढून तेथील ग्रंथालयाला भेटी देऊन आवश्यक त्या ग्रंथाची खरेदी करीत असत. त्यांनी आपल्या हयातीत कला, साहित्य, संगीत, खेळ व नाट्य या सर्व क्षेत्रांत रस घेतल्याचे दिसून येते. साहित्याच्या क्षेत्रात आपली भूमिका नम्र रसिकाची आहे, असे ते आवर्जून सांगतात. साहित्याचा त्यांचा गाढ अभ्यास असून ते रसिक साहित्यिक आहेत. महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण संस्कृतीचा जणू उदात्त संगमच त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला आहे. भाषणात बोलताना ते वि. स. खांडेकर यांच्या साहित्यातील, तसेच अनेक क्षेत्रांतील वेगवेगळे कलावंत व त्यांच्या कला यांचे दाखले देत असत. यावरून त्यांच्या चौफेर वाचनाची श्रोत्यांना कल्पना आल्यावाचून राहत नाही. त्यांना आवडणाऱ्या पहिल्या पुस्तकाचा उल्लेख करताना ते वि. स. खांडेकर यांच्या 'दोन ध्रुव' या कादंबरीचा उल्लेख करतात. कोल्हापूरला असताना भुसारी वाड्यातील एका पावसाळी दुपारी ही कादंबरी एका वाचनात पूर्ण केली, असे ते सांगतात. त्याचबरोबर कुठेही ते भाषणाकरिता जेव्हा जातात, तेव्हा ते राजकारणासोबत साहित्यालादेखील महत्त्वाचे स्थान देतात. आपल्या उत्स्फूर्त भाषणात मराठी संत परंपरा, संतांचे



Scanned with OKEN Scanner

सामाजिक योगदान, अव्वल दर्जाचे आंग्ल नाटककार, आधुनिक मराठी कवी, नाटककार यांचे दाखले देऊन ते भरभरून बोलत. उंच, करारी आवाज त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अधिकच भर घालत असे.

यशवंतराव चव्हाण यांच्या वाचनाच्या छंदाबद्दल बॅ.पी. जी. पाटील म्हणतात, ''यशवंतरावांचे वाचन दांडगे होते. ते सुंदर मराठी लिहीत. त्यांना मराठी गद्याची फार आवड होती. त्यांची शैली निर्मळ, प्रसन्न, स्पष्ट, ओघवती आणि ओजस्वी होती. ती माणसाच्या हृदयाला जाउन भिडे.'' यावरून त्यांची साहित्यिक दृष्टी नजरेत आल्यावाचून राहत नाही. त्यांनी राजकारण सांभाळीत हिंदी, इंग्रजी, मराठी व अन्य भाषांतील साहित्य वाचून आपल्या साहित्यप्रेमात खंड पडू दिला नाही. समाजाची उन्नती खऱ्या अर्थाने व्हायची असेल तर उच्च शिक्षण हे मातृभाषेतून दिले गेले पाहिजे, असे त्यांचे मत होते. ते आपल्या भाषेव्यतिरिक्त इतर भाषेचा द्वेष न करता मातृभाषा, मातृभाषेच्या जोडीला हिंदी आणि हिंदीच्या जोडीला इंग्रजी अभ्यासत राहणे त्यांना गरजेचे वाटत होते.

मराठी भाषा व मराठी साहित्य यांच्याबद्दल त्यांना अफाट प्रेम आहे. वास्तविक संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आचार्य अत्रे हे त्यांच्या विरोधकातील प्रमुख, पण आचार्य अत्र्यांना त्यांच्याबद्दल शेवटपर्यंत अतिशय प्रेमादर होता. केवळ त्यांचे साहित्यप्रेमच होते असे नाही तर त्यांनी केलेले प्रत्यक्ष लेखनसुद्धा साहित्यिक गुणांनी युक्त आहे. १९८४ मध्ये यशवंतराव साहेबांना पहिला साहित्य सन्मान मिळाला.

राजकारण व साहित्य दोघांचेही माध्यम शब्द आहे. म्हणूनच राजकारणी हे साहित्यिकांचे शब्दबंधू असतात, असे ते एका भाषणात म्हणाले होते. साहित्यिकांना शब्दबंधू म्हणणाऱ्या यशवंतराव चव्हाणांचे व्यक्तिमत्त्व हे ललित व्यक्तिमत्त्व होते. भारताचे सामर्थ्य एकरूपता व अखंडता राहावी, त्याची संस्कृती जात व धर्म यांविषयी भारतात फुटीरता आणि विषमतेची भावना बळावू नये म्हणून ते सतत झटत होते. जीवनावर प्रेम करा असे ते साहित्यिकांना सतत उपदेश करत. यशवंतरावांना नाटक पाहण्याचे व वाचण्याचे आकर्षण लहानपणापासूनच होते. काही नाटकांत त्यांनी सहभाग घेतल्याचे ते सांगतात. समाजातील विषमता, संघर्ष मध्यमवर्गीय लोकांच्या समोर नाटकाच्या माध्यमातून येणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' यातील खांडेकराची भूमिका यशवंतरावांना पटताना जाणवते. त्यांच्या मते, कादंबरी, नाटक किंवा काव्य लिहिताना त्या गोष्टीशी समरस असलेली व्यक्तीच ते कार्य यशस्वीरीत्या करू शकतो. मुंबईमध्ये राहणाऱ्या लेखकाने ग्रामीण भागाचे चित्रण करणे त्यांना विसंगती वाटते. कलावंतांबद्दल त्यांना आदर होता. कलाकाराच्या कलेला दाद देण्यात हा मुख्यमंत्री मात्र कुठेच कमी पडला नाही. कार्यक्रम कोठेही असो, त्याचा त्यांना कंटाळा वाटत नसे. तेथे जाऊन ते चित्रांचे प्रदर्शन वा ग्रंथप्रदर्शन आवर्जून बघायचे. आपले असामान्यत्व बाजूला सारून सामान्यांत मिसळणारा हा नेता आगळावेगळा होता. राजकारणी लोक सामान्यत: साहित्यिक नसतात. त्यांना राजकारणात जास्त रस असतो. यशवंतराव चव्हाण मात्र या गोष्टीला अपवाद होते. जीवन आणि समाज यांच्यातले जिवंत नाट्य लोकाभिमुखतेने पकडणारी कला, हेच नाट्य अशी ते नाटकाची अचूक व्याख्या करतात. साहित्यिकांना जर भाषा संपन्न व्हावी असे वाटत असेल तर विचारांना मोकळे सोडून द्या असे ते नेहमी म्हणत. मराठी भाषा ही जिवंत भाषा आहे. ती ऊसासारखी वाढली पाहिजे. जमिनीतील सत्त्वे आणि शक्ती शोषून ऊस वाढतो तसे मनातील सत्त्व आणि विचारातील शक्ती खेचून भाषा जोम पावते. सामाजिक, साहित्यिक सांस्कृतिक मूल्यांची फारकत करता येत नाही... हे त्यांचे विचार आजही समाजाला प्रेरक आहेत.

स्व. यशवंतराव चव्हाणांचे साहित्यिक म्हणून वेगळे स्थान आहे, हे सर्वमान्य आहे. ते उत्तम वाचक, चोखंदळ रसिक तर आहेतच; पण साहित्यिक म्हणून त्यांचे मराठी साहित्यातील स्थान खूप मोठे आहे. त्यांनी लिहिलेल्या वेगवेगळ्या १७८ पुस्तकांच्या अभ्यासपूर्ण प्रस्तावना याची साक्ष देतात. व्यासपीठावरून शक्यतो राजकारणी लोक पक्षांसंबंधी, प्रचारासंबंधी अधिक बोलतात. आपला वरचढपणा व दुसऱ्या पक्षांवर टीका अधिक असते; पण या सर्व गोष्टीला यशवंतराव चव्हाण यांचे व्याख्यान अपवादच म्हणता येईल. राजकारणातील त्रासाचा वीट जेव्हा त्यांना येतो तेव्हा आपणसुद्धा रवींद्रनाथ टागोरांप्रमाणे शांतिनिकेतन काढून समाजकारण आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून विद्यार्थ्यांना समाजाचे शिक्षण द्यावे, असे मत ते व्यक्त करतात. यावरून त्यांना साहित्य, शिक्षण यांमध्ये अधिक रस असल्याचे दिसते. त्याचबरोबर जात-पंथ-धर्म यांच्या अभेद्य भिंती उद्ध्वस्त करून लोकशाहीचे राजकारण वाढीस लागावे अशी मनोमन इच्छा असल्याचे दिसते.

ना. सी. फडके एकदा यशवंतराव चव्हाणांच्या लेखनाबद्दल म्हणाले होते, की भावनेने ओथंबलेले, प्रभावी भाषेने नटलेले लेखन जी लेखणी करू शकते, ती साधीसुधी नाही. अस्सल साहित्यिकांच्या हातात शोभावी अशीच ती आहे. यशवंतराव चव्हाणांच्या लेखनाचा मी जेव्हा आस्वाद घेतो तेव्हा माझ्या मनात येते. यशवंतराव यांच्या रूपाने महाराष्ट्राला व भारताला एक पहिल्या दर्जाचा नेता मिळाला खरा; परंतु त्यांच्यावर पडलेल्या नेतेपणाच्या ओझ्यामुळे यशवंतरावांच्या ठिकाणी जो श्रेष्ठ साहित्यिक आहे त्याचे पूर्ण कर्तृत्व प्रगट होत नाही. कृष्णाकाठ ने याचा प्रत्यय दिला आहे.

यशवंतराव चव्हाण यांनी अनेक मंत्रिपदे भूषवली. त्याचबरोबर

अनेक क्षेत्रांत महाराष्ट्राला दिशा देणारे कार्य केले. तसेच साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे असे भरीव योगदान दिले. अनेक कलावंतांना प्रोत्साहन देऊन त्यांनी मदतीचा हात दिला आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक योगदानात त्यांची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिली आहे.

लोककला ही अभिजात कला आहे. ती निखळ करमणूक आणि सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकणारी असावी यासाठी लोकनाट्य ही कला लोकवस्तीपासून दूर ठिकाणी सादर करण्याऐवजी नागरीवस्तीच्या ठिकाणी सभ्य स्त्री-पुरुषांसमोर कला सादर करावी म्हणजे लोककलेतील अश्लीलता जाऊन निखळ मनोरंजन होईल ...चे मत होते. यशवंतराव चव्हाण यांच्या काळात ग्रामीण ...तमाशा किंवा लोकनाट्य हे समाजजागृतीचे प्रभावी माध्यम होते. त्यांनी हे जीवन जवळून अनुभवले असल्याने त्यांना या कलेबद्दल सहानुभूती व प्रेम होते म्हणून त्यांनी नाटक महोत्सवाप्रमाणे तमाशा महोत्सव सुरू करून त्यांना शक्य तेवढ्या सोयी निर्माण करून दिल्या. तमाशासाठी लागणारे साहित्य तमासगीरांना मोफत देऊन अडीअडचणीत अर्थसाहाय्य करून या कलांना वाढीस लावण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. त्यांनी साहित्याची सेवा करण्याचा जणू चंगच बांधलेला दिसतो. म्हणूनच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी यशवंतरावांचा एक थोर 'विचारवंत आणि साहित्य सेवक' या शब्दांत गौरव केला, तो पूर्णतः यथोचित वाटतो. १९५२ मध्ये पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत यशवंतरावांचे झालेले भाषण हेही साहित्यिकी गुणांचा एक उत्कृष्ट नमुना म्हणता येईल.

सांस्कृतिक सामर्थ्य वाढवण्यासाठी त्यांनी वेळोवेळी प्रयत्न केले. चव्हाण साहेबांचा मूळपिंड कलावंताचा, रसिक श्रोत्याचा होता. संगीत, स्वर, शब्द यांच्यावर त्यांचे प्रभुत्व होते. देशातील सांस्कृतिक घडामोडींविषयी त्यांचे विचार प्रेरणादायी आहेत.

देशातील जुनाट आणि कालबाह्य अशा सामाजिक रचनेची केंद्रस्थाने बदलावी लागतील आणि त्यासाठी लोकांच्या अभिरुचीविषयी जाणीव जागृती वेळोवेळी निर्माण केली पाहिजे. कलावंत व साहित्यिक यशवंतराव चव्हाणांचे जिव्हाळ्याचे विषय होते. साहित्यिकांच्या आणि कलावंतांच्या सहवासात ते मनापासून रमलेले दिसतात. त्यांचा राजकारणात विविध पदांवर वावर झाला असला, तरी त्यांचे साहित्यगुण लपविले जात नाहीत. वैचारिक नेता म्हणून श्रेष्ठत्व पावलेल्या यशवंतरावांचे विचार आणि व्यक्तिमत्त्व अभेद्य असे आहे. एकूणच त्यांचा सामान्य विद्यार्थी-गृहमंत्री-संरक्षणमंत्री ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असा राजकीय प्रवास असला तरी त्यांचा साहित्यप्रवासदेखील अखंडित असा आहे. त्यांचे साहित्यप्रेम वाखाणण्याजोगे असे आहे.

***



कविता

# आई

आईसारखं प्रेम कुणीच करत नसतं. तिच्या प्रेमळ सहवासातच आपलं जीवन बदलत असतं. मला आठवतं. माझं रम्य ते बालपण; बालपण कसलं? ते तर सुवर्णक्षण. ते सोनेरी क्षण नेहमीच स्मरणात राहतील. त्या नुसत्या आठवणीही जीवनाला कलाटणी देतील. माझ्या प्रत्येक जखमेवर तू प्रेमाची फुंकर घातलीस म्हणून ती जखम मला जखम नाही वाटली. मला काही झालं, की तू स्वतःच झुरायचीस. दिवस नि रात्र जागून काढायचीस. असाच प्रेमळ हात नेहमी पाठीवरून फिरावा. कारण मला कधीही, सोसणार नाही दुरावा... जीवन कसं जगावं हे तूच मला शिकवलं. तुझ्यामुळेच आज मी स्थिरपण गाठलं. माझ्या प्रत्येक यशात तुझा सिंहाचा वाटा आहे. माझ्यासाठी ते यश आनंदी जीवनाचा साठा आहे. तुझ्या उरी जन्म घेऊन मन कसं भरणार! कितीही मिळाले जन्म तरी तुझेच कन्यारत्न होणार आज माझ्या नावाचा मला अभिमान वाटतो. भाग्य आणि भाग्यश्रीचा खरा अर्थ कळतो.

- भाग्यश्री कचरू फुलेलवाड

स.शि. प्रा. शा. रायपूर, कें. डोणगाव, ता. गंगापूर

# पर्यावरण निरीक्षण



चला शाळेत जाऊया
निसर्ग धडा शिकवूया..

रंगीबेरंगी पान-फुले
त्यावर खेळती फुलपाखरे
रंग त्याचे वेगवेगळे
नोंदून काढा चित्र बरे

फुलपाखरांसंगे फिरूया
चला निसर्गशाळेत जाऊया

उंच आकाशी अनेक पक्षी
जमिनीवर कोणी काढे नक्षी
गवतावर फिरती
शेतावर उडती
पाण्यात पोहती पाणपक्षी

पक्ष्यांची घरटी शोधूया
निसर्गशाळेत शिकवूया

अनेक झाडे अनेक वेली
काटेरी झुडपे नि कंदमुळी
रानभाजी रान कांदा
ऐकू घेऊ वैदिक फायदा

रानमेवा जमा करूया
निसर्ग शाळेत शिकवूया

- अशोक क. गायकवाड

मो. ७५८८८१२२७६



Scanned with OKEN Scanner